५ वा वर्धापन दिन... विशेषांक

॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

अविरत सेवेची शर्त
वचनबध्दतेचे पाच वर्षे पूर्ण
सहाव्या वर्षात पदार्पण

अहिल्यानगर | शनिवार, दि. १९ एप्रिल २०२५ | वर्ष ६ वे | अंक १० वा | पाने ८ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145 | www.veerbhuminews.com

आशिर्वाद



स्व. योगेश भालेराव

॥श्री रेणुकामाता प्रसन्न ॥



नवी क्षितिजे, नवी आशा
शुध्द नीती, अतूटनाती,
दूरदृष्टी अन् अर्थसेवेतून

नवी आव्हाने, नवी दिशा..।
हाच आमुचा पाया..
प्रगतीचे शिखर गाठूया..।

आशिर्वाद



स्व. चंद्रकांत भालेराव

## श्री रेणुकामाता मल्टीस्टेट

### को. ऑप. अर्बन क्रेडिट सोसायटी लि.

मुख्य कार्यालय : रेणुका भवन, सिटी सर्व्हे नं. ३५/२ अ+२ब, सिटी प्राईड हॉटेलजवळ, पाईपलाईन रोड, सावेडी, अहमदनगर



संस्थेचा विस्तार
९ राज्यात १३८ शाखा

दैनिक वीरभूमी
वर्धापनदिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!

### अत्याधुनिक सुविधा आणि सुरक्षा अभिवचन पूर्ण करण्यासाठी आम्ही वचनबधद आहोत..!

आजच्या स्पर्धेच्या युगात तेच लोक काम करतात जे स्पर्धा करुन इतरांपेक्षा आपला वेगळा ठसा जनमाणसांवर उमटवतात, आम्हास अभिमानाने सांगावेसे वाटते की, आम्ही त्यापैकी एक बनण्याचा प्रयत्न करीत आहोत. ग्राहक सेवा हेच आमचे ब्रिद वाक्य आहे. त्यामुळेच ग्राहकांसाठी सकाळी ९ ते रात्री ७ वा. अविरत सेवा आम्ही देतो. त्याचप्रमाणे व्यापारी वर्गाचे हित लक्षात घेता. भारतातील प्रमुख शहरावरील डी. डी. सेवा फक्त ५ पैशात उपलब्ध.

संपर्क
टोल फ्री नं. 18002334140
मोबाईल
9225328394, 9225328301, 9225328571
Website www.renukamatamultistate.com
Email callcenter@renukamatamultistate.com

इथं ग्राहकांच्या गरजांना अधिक महत्व दिलं जातं !




- श्री रेणुकामाता मल्टीस्टेटच्या सर्व शाखांमध्ये एटीएम मशीन उपलब्ध करण्यात आले असून या मशीनवर सर्व बँकांचे एटीएम कार्ड चालतात.
- तसेच संस्थेच्या सर्व खातेदारांना एटीएम कार्ड उपलब्ध केले असून हे कार्ड त्यांना कोठेही कोणत्याही बँकेच्या मशीनवर वापरता येणार आहे.
- बीबीपीएस सूविधा : लाईट बिल, रिचार्ज फोन बिल, इन्शुरन्स पेमेंट, कर्जाचे हफ्ते, गॅस बुकिंग, क्रेडिट कार्ड बिल पेमेन्ट, फास्ट टॅग रिचार्ज आदीं सुविधा उपलब्ध

#### संस्थेची वैशिष्ट्ये

संस्थेचे कामकाज सकाळी ९ ते रात्री ७ पर्यंत. ठेवींना आकर्षक व्याजदर. विनयशील व तत्पर सेवा, आकर्षक कर्जसेवा उपलब्ध. संपूर्ण संगणकीकृत शाखा. भारतातील प्रमुख शहरांवरील डिमांड ड्राफ्टची सेवा फक्त ५ पैशात सोनेतारण कर्ज सेवा १२/३६५ दिवस उपलब्ध. भारतात कोठेही अर्ध्या तासात पैसे वर्ग करण्याची सुविधा, भारतात कोठेही पैसे स्वीकारण्याची सुविधा.

#### व्यवसाय वाढीसाठी



- आमच्या पॉज मशिनचा उपयोग करा.
- आमच्या पॉज मशिनद्वारे सर्व बिलांचे रक्कम क्रेडिट कार्ड व डेबिटकार्डद्वारे स्विकारले जातील.
- आमच्या सर्व शाखांमध्ये कोणत्याही बँकेच्या खातेदारास रक्कम काढण्याची सेवा उपलब्ध.

#### एफ.डी.आर. दर

- ३१ दिवस ते ६ महिने ८.५ % (द.सा.द.शे.)
- ६ महिने ते १ वर्ष ९.५० % (द.सा.द.शे.)
- १ वर्षापेक्षा जास्त १० % (द.सा.द.शे.)
- दामदुप्पट ठेव ८४ महिने.

NCP शेअर्स १२ महिने ११ टक्के लाभांश

ज्येष्ठ नागरिक, विधवा महिला, माजी सैनिक व अपंग नागरीकांसाठी ०.५०% जास्त व्याजदर




#### सुलभ कर्ज योजना

- वैयक्तिक घर
- सोने व वाहन तारण
- तातडीची कर्ज सुविधा

#### विशेष सुविधा

- डी मॅट अकाऊंट
- ट्रेडींग अकाऊंट
- म्युच्युअल फंड

#### मोफत सुविधा

RTGS व NEFT फोन बील, लाईट बील, रिचार्ज INWARD, RTGS/NEFT पॉज मशिन, क्यु आर कोड, क्रेडिट कार्ड सुविधा

#### विमा सुविधा

- हेल्थ इन्शुरन्स
- मोटर इन्शुरन्स
- टर्म लाईफ इन्शुरन्स

## मागे वळून पाहातांना...!

अहिल्यानगर जिल्ह्यात डिजीटल व प्रिंट अशी स्वतंत्र आवृत्ती म्हणून 'वीरभूमी'ची मुहूर्तमेढ रोवण्याला आज पाच वर्षे पूर्ण होतायत. स्पर्धेच्या युगात अत्याधुनिकतेची कास धरून, काळाचे बदल तत्परतेने स्वीकारत 'आपल्या भूमीतील आपला आवाज' बनलेले डिजीटल दैनिक म्हणून 'वीरभूमी'ने जो लौकिक प्राप्त केलाय, तो केवळ वाचकांच्या नि:संदिग्ध पाठबळावर. विश्वासार्ह पत्रकारितेचा आदर्श घालून देत, सामाजिक बांधिलकीचे व्रत जोपासत 'वीरभूमी'ची आश्वासक वाटचाल सुरू आहे. अहिल्यानगर जिल्हा सुरुवातीपासूनच सहकार क्षेत्रात अग्रेसर आहे. ऊस, कांदा, कापूस, बाजरी ही या भागातील मुख्य पिके. सर्वात जास्त साखर कारखाने असल्यामुळे साखर उत्पादनात नेहमी आघाडी असते. साईबाबा, शनिदेवाचे शिंगणापूर, संत ज्ञानेश्वर, आचार्य आनंदऋषीजी, अगस्तीऋषीजी, चैतन्य कानिफनाथ, संत भगवानबाबा, हिंदू-मुस्लिम एकतेचे प्रतिक असलेल्या संत महंमद शेख महाराज, संत निळोबाराय अशा विविध संतासह



**महादेव दळे**
– संपादक/९४२०८०२१४५

धार्मीक पर्यटन व नैसर्गिक पर्यटनाने नटलेला जिल्हा म्हणुन नावलौकीक मिळवला. या सहकाराच्या जिल्ह्यात वाचकांच्या पसंतीची, समाजाची गरज ओळखून 'वीरभूमी'ने माध्यम म्हणून चोख भूमिका बजावण्याचा निर्धार केला. नगर जिल्ह्यात पूर्ण क्षमतेने 'वीरभूमी'ची डिजीटल आवृत्ती पाच वर्षापूर्वी सुरु झाली. या पाच वर्षाच्या वाटचालीत दर्जेदार लेखन, स्वतःची आदर्श आचारसंहिता पाळत 'वीरभूमी'ने वाचकांच्या मनावर अधिराज्य निर्माण केले. अडचणीच्या काळातही प्रतिकूल स्थितीवर मात करत केवळ वाचकांना काय हवे, समाजाची मागणी काय आहे, हे ओळखून प्रबोधनपर लेखनावरच अधिक भर दिला. सकारात्मक पत्रकारितेचा आदर्श घालून देताना समाजात जे-जे चांगले त्या सर्व विषयांना केवळ भक्कम पाठबळच दिले नाही, तर अशा विषयांना व घटकांना वेळोवेळी उत्स्फूर्त प्रोत्साहनही दिले.हे करत असतानाच वाईट प्रवृत्तींवर कठोर प्रहार करण्यात 'वीरभूमी' कधी मागे हटला नाही. म्हणूनच अहिल्यानगरच्या वाचकांचा विश्वास संपादन करण्यासह 'वीरभूमी' त्यांच्या जीवनाचा अविभाज्य घटक बनला. समाजाच्या अनुषंगाने मजकूर देताना प्रत्येक वयोगट, प्रत्येक घटकाला डोळ्यासमोर ठेवून त्यांना नित्य दिनचर्येत उपयोगी पडेल, अशा प्रकारच्या लेखनावर 'वीरभूमी'चा भर राहिला. आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा, उद्योग, व्यवसाय, क्रीडा या सर्व क्षेत्रांना स्पर्श करताना प्रत्येक क्षेत्रातील बदलांचा आढावा घेत 'वीरभूमी'ने आपले कर्तव्य बजावण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलाय. कोरोना सारख्या आपत्तीमध्ये 'वीरभूमी'ने ठोस भूमिका घेत वाचकांना धीर देत भिती निर्माण होणार नाही याची काळजी घेत विश्वासर्हता जपली. वाचकांच्या याच विश्वासाच्या जोरावर यशस्वीपणे पाच वर्षे यशस्वीपणे पार केली. या पाच वर्षाच्या काळात अनेक चढउतार पार करत 'वीरभूमी'ने आपला वेगळा ठसा उमटवत पत्रकारितेचा वसा जपला आहे. या प्रवासात वाचक, विक्रेते, जाहिरातदार, हितचिंतक अशा सर्वच समाजघटकांनी दर्शविलेला विश्वास, प्रेम हे 'वीरभूमी' साठी अत्यंत मोलाचे आणि प्रेरणादायी आहे. यापुढेही ही सर्व मंडळी आमच्याप्रति असलेली विश्वासार्हता कायम ठेवून स्नेह वृद्धिंगत करेल, याबद्दल आमच्या मनात शंका नाही.

# जीर्णोध्दार व विकासकामांना आमचा विरोध नाही

### आमीन शेख यांचे स्पष्टीकरण | दुसऱ्यादिवशीही श्रीगोंदा शहर बंद

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

शेख महंमद बाबा देवस्थान जिर्णोद्धारास आमचा कधी विरोध नव्हता व करणारही नाही. गेल्या अनेक वर्षांपासून लोकप्रतिनिधींनी आणलेल्या निधीतून विविध विकासकामे झाली. यात आम्ही कधीही हस्तक्षेप केला नाही व पुढेही करणार नाही. मात्र दर्गा जीर्णोध्दार व यात्रा भरविण्यासाठी शासकीय समिती स्थापन करून दर्गा ट्रस्ट व यात्रा समितीच्या सदस्यांना प्रतिनिधित्व द्यावे तसेच ट्रस्ट व यात्रा समितीच्या काही बाबीत न्यायालयीन प्रक्रिया सुरू आहे. न्यायालयाचे दिलेले व येणारे आदेश आम्हाला मान्य आहेत. तरी लोकभावना भडकावून आंदोलन करणाऱ्या व्यक्तींना चर्चेचे सर्व मार्ग मोकळे आहेत असे संत श्री शेख महंमद महाराज यात्रा समितीच्या सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर हजरत शेख महंमद बाबा ट्रस्टचे विश्वस्त अमिन शेख यांनी दै. वीरभूमी प्रतिनिधीशी बोलताना स्पष्ट केले.

पुढे बोलताना श्री. शेख यांनी सांगितले की, १९८० साली तत्कालीन आमदार बबनराव पाचपुते यांच्या माध्यमातून देवस्थान शुभोभीकरणाचे काम करण्यात आले. राहुल जगताप आमदार असताना देवस्थानच्या आत पेव्हिंग ब्लॉक व हायमॅक्स दिवा बसविला. तर मा. खा. सुजय विखे पाटील व माजी मंत्री बबनराव पाचपुते यांच्या प्रयत्नातून देवस्थानाच्या सुशोभिकरणासाठी १ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला. या निधीतून बाहेरील पटागंणात पेव्हिंग ब्लॉक बसविण्यात आले. व आतमध्ये विविध विकासकामे करण्यात आले. तसेच लोकवर्गणीतून देखील ट्रस्टच्या माध्यमातून विविध विकासकामे करण्यात आले. आम्ही कधीही विकास कामास विरोध केला नाही. आम्ही देवस्थान जिर्णोद्धार विकासकामास विरोध करत आहोत हा आरोप खोटा आहे. तसेच शेख महंमद बाबा यांच्या समाधीवर दररोज अर्पण करण्यात येणारा शेरा व दर गुरुवारी होणारे अन्नदानास आम्ही विरोध केला हा आरोप देखील खोटा असल्याचे ट्रस्टचे अध्यक्ष, बाबांचे वंशज आमीन शेख यांनी सांगितले.

दि. १६ रोजी शेख महंमद बाबा देवस्थान जिर्णोद्धार होणेकामी श्रीगोंदा तहसील कार्यालयात आ. विक्रमसिंह पाचपुते व प्रशासकीय अधिकारी, पोलीस उपअधिक्षक मिलिंद वाखारे, प्रांताधिकारी श्रीनिवास चिंचकर, पोलीस निरीक्षक किरण शिंदे, मुख्याधिकारी पुष्पगंधा भगत, नायब तहसीलदार पंकज नेवसे यांच्यासोबत आमची बैठक झाली. या बैठकीत शेख महंमद बाबा दर्गाह ट्रस्टच्या नावात बदल करुन शेख महंमद बुवा देवस्थान करावे अशी सुचनाही आम्ही मान्य केली. देवस्थान जिर्णोद्धार काम करण्यासाठी ट्रस्टच्या मान्यतेने एक शासकीय समिती स्थापन करावी लागेल. त्याकामी ट्रस्टची नाहरकत द्यावी लागेल, या शासकीय समितीत विद्यमान आमदार, तहसीलदार, पोलीस निरिक्षक, नगरपरीषद मुख्याधिकारी, सार्वजनिक बांधकाम उप अभियंता, ट्रस्टच्या वतीने व यात्रा कमेटीच्या वतीने एक-एक सदस्स राहील, असे एकुण सात सदस्यांची समिती राहील. ही समीती स्थापन करण्यासाठी ट्रस्टच्या वतीने बैठकीत मान्यता देण्यात आली. शेख महंमद बाबा यांचे वंशज, पुजारी यांची निवासस्थाने देवस्थानच्या जागेतच बांधुन देण्यात येईल. कोर्टात देवस्थानच्या बाबत असलेले सर्व दावे ट्रस्टने मागे घ्यावीत व यात्रा कमेटीच्या वतीने देखील कोर्टात असलेले दावे मागे घेण्यात येईल, असे बैठकीत ठरवण्यात आले. परंतू बैठकीत ठरवण्यात आलेले विषय यात्रा कमेटीस मान्य नसल्याचे समजते. हे आंदोलन विनाकारण नागरिकांना वेठीस धरण्यासाठी व ट्रस्टबाबत गैरसमज पसरविण्यासाठी असून शांततेने, सामोपचाराने व कायदेशीर मार्ग काढण्यास आम्ही तयार असल्याची माहिती श्री. शेख यांनी बोलताना दिली.

### दुसऱ्या दिवशीही श्रीगोंदा शहर बंद

■ संत श्री शेख महंमद महाराज यांच्या मंदिरासाठी ग्रामस्थांनी सुरू केलेल्या दि. १७ पासून धरणे आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशीही श्रीगोंदा शहर बंद होते. तहसील कार्यालयासमोर सुरू असलेल्या आंदोलनात दुसऱ्या दिवशी तुरळक नागरिकांचा प्रतिसाद मिळाला. यावेळी येथे भजन कीर्तन सुरू आहेत. शुक्रवारी सकाळी हभप. निजामभाई शेख यांचे एकतारी पोवाड्याचे आयोजन करण्यात आले होते. तर रोज रात्री कीर्तनाचा कार्यक्रम सुरू आहे. मात्र रोजच शहर बंद असल्याने व्यापारी संघटना व छोट्या व्यावसायिकांचा नाराजीचा सूर उमटत आहे.



# बिबट्याच्या हल्ल्यात शेतकरी गंभीर जखमी

**● पारनेर । वीरभूमी –**

पारनेर तालुक्यातील कान्हूर पठार येथील भिल्ल वस्तीत सकाळी दबा धरुन बसलेल्या बिबट्याने हल्ला केल्याने पंढरीनाथ भिका बर्डे (वय ३७) हे शेतकरी गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेने कान्हूर पठार व परिसरामध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.



याबाबत मिळालेल्या माहितीनुसार कान्हूर पठार येथील भिल्ल वस्तीत राहणारे पंढरीनाथ भिका बर्डे हे नेहमी प्रमाणे विहिरीवरील मोटर चालू करण्यासाठी गेले होते. त्यावेळी दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्यांच्या पाळीव कुत्र्यावर हल्ला केला. हल्ला झाल्याने कुत्रा जीव वाचविण्यासाठी पंढरीनाथ बर्डे यांच्या दिशेने पळाला. त्याच्या मागे आलेल्या बिबट्याने वेगाने येऊन हल्ला केला. या हल्ल्यात पंढरीनाथ बर्डे गंभीर जखमी झाले असून त्यांच्या दोन्ही हातांना व डोक्याला गंभीर जखम झाली आहे. हल्ला झाल्यानंतर बर्डे यांनी न डगमगता व न घाबरता बिबट्याचा प्रतिकार करत आरडाओरड केली. यामुळे तेथून बिबट्या पळून गेला. गंभीर जखमी पंढरीनाथ बर्डे यांना कान्हूर पठार येथील आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार केल्यानंतर पुढे नगर जिल्हा रुग्णालयात दाखल केले. घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे वनपाल निलेश बडे, भिमराव दवणे, सरपंच संध्या ठुबे यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला.

# पाथर्डीचे ग्रामदैवत खोलेश्वर यात्रेत कुस्त्यांचा थरार

**● पाथर्डी । वीरभूमी –**

शहराचे ग्रामदैवत श्री खोलेश्वर यात्रेत नामांकित पैलवानांच्या इनामी रोमहर्षक लढतीत कुस्त्याचा थरार उपस्थित हजारो कुस्तीप्रेमींना अनुभवायला मिळाला. डाव, प्रतिडाव, रोमहर्षक चितपट कुस्त्यांनी कुस्ती रसीकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.

या खोलेश्वर यात्रा कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन श्रीफळ वाढवून पोलिस उपनिरीक्षक महादेव गुट्टे व पाथर्डीचे मुख्याधिकारी संतोष लांडगे यांच्या हस्ते झाले. यावेळी दिनकर पालवे, बंडु बोरुडे, यात्रा कमिटीचे अध्यक्ष श्रीहरी बोरुडे, बाळासाहेब जिरेसाळ, शुभम सुपेकर, आजिनाथ डोमकावळे, दिगंबर गाडे, प्रतीक खेडकर, महेश पवार, महेश बोरुडे, पुरषोत्तम इजारे, भोरू म्हस्के, तुकाराम पवार, बाबा दुधाळ, सतीश काटे, राजेंद्र ऊदारे, शुभम तुपे, गणेश नांगरे, आदित्य डोमकावळे, किशोर बोरुडे, चव्हाण, बबलु बोरुडे, शिवा डोमकावळे, गणेश नांगरे, प्रसाद बोरुडे, विजय शिंदे, ऋषिकेश पानगे आदींसह कुस्तीप्रेमी मोठ्या संख्येने हजर होते.

या स्पर्धेत महीला कुस्तीपटुंनीही मोठ्या संख्येने सहभागी होऊन कुस्त्या केल्या. महीला युवतींची पुजा साठे मिरजगाव व धनश्री नवथर यांची चितपट झालेली कुस्ती अविस्मरणीय ठरली. शेवटची इनामी कुस्ती हरियाणाचे पै. नविन मोर व पै.कृष्णा पवार पाथर्डी यांची मानाची कुस्ती चितपट झाली. पै.कृष्णा पवार याने या कुस्तीत प्रतिस्पर्ध्याला चितपट करुन बाजी मारली. या स्पर्धेत पंच म्हणून पै. सुभाष बोरुडे, पै. राजेंद्र सोनटक्के, सुधाकर पानखडे यांनी काम पाहीले. उमेश केकाण यांनी कुस्त्यांचे उत्कृष्ट समालोचन केले. तर शुभम सुपेकर यांनी आभार मानले. या कुस्ती स्पर्धेत यात्रा उत्सव समितीच्या वतीने मोठ्या प्रमाणावर बिदागी देण्यात आली.



# डॉ. सुजय विखेंचे पारनेरमध्ये कार्यकर्त्यांकडून स्वागत



● **नगर । वीरभूमी-**

डॉ. सुजय विखे पाटील आज पारनेर दौऱ्यावर आले असता त्यांचे पारनेर शहरात भाजप माहितीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जल्लोषात त्यांचे स्वागत केले.

यावेळी आमदार काशिनाथ दाते, भाजपा तालुका अध्यक्ष राहुल शिंदे, राष्ट्रवादीचे नेते प्रशांत गायकवाड, किरण कोकाटे, युवराज पठारे, मनोज मुंगसे, वसंत चेडे, अण्णा नरसाळे, प्रितेश पाणमल आदी उपस्थित होते.

नागेश्वर ग्रामीण पतसंस्था पारनेर येथे संपन्न झालेल्या या कार्यक्रमादरम्यान डॉ. सुजय विखे पाटील यांनी उपस्थितांशी संवाद साधला. तसेच नागरिकांच्या समस्या व निवेदन स्वीकारून त्यांच्या समस्येचे निराकरण करण्याच्या अनुषंगाने चर्चा केली.

तसेच पारनेरचे माजी नगराध्यक्ष विजयराव औटी यांनी त्यांच्या जन्मदिवसाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या बैलगाड्या शर्यतीला देखील उपस्थित दर्शविली. डॉ. सुजय विखे पाटील यांनी बैलगाडा शर्यत पाहण्याचा आनंद घेतला. तसेच विजयराव औटी यांना जन्मदिवसाच्या आमदार काशिनाथ दाते यांच्यासमवेत डॉ. सुजय विखे पाटील यांनी शुभेच्छा दिल्या.

तसेच अंबिका माता यात्रा गोरेगाव व माजी सभापती बाबासाहेब तांबे सोशल फाऊंडेशनतर्फे भव्य कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. कुस्त्यांच्या जंगी मैदानात आयोजित कार्यक्रमाला देखील डॉ. सुजय विखे पाटील यांनी उपस्थिती दर्शविली व कुस्ती लावून हा रंगतदार खेळ पाहण्याचा आनंद घेतला.

अनेक वर्षांपासून सदरील कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात येत असून हा उत्सव परिसरातील लोक मोठ्या आनंदाने साजरा करत असतात. मी देखील आज गोरेगावच्या यात्रेनिमित्त आपल्या सगळ्यांना आमच्या विखे पाटील परिवाराच्या वतीने व नामदार राधाकृष्ण विखे पाटील साहेबांच्या वतीने यात्रेसाठी शुभेच्छा देतो असे मत डॉ. सुजय विखे पाटील यांनी मांडले.
























# ऊस पिकात कृत्रीम बुध्दीमत्तेचा प्रभावी वापर करुन उत्पादन वाढवावे

## बिपीनदादा कोल्हे । दिल्ली व संजीवनी ग्रुपच्या सहकार्याने शिर्डीत शेतकऱ्यांसाठी एकदिवसीय परिसंवाद

**कोपरगाव । वीरभूमी –** साखर उद्योगात प्रचंड स्पर्धा आहे, दिवसेंदिवस तंत्रज्ञान प्रगत होत आहे, शेतकऱ्यांनी इफको नॅनो खताबरोबरच उस पिकात कृत्रीम बुध्दीमत्तेचा प्रभावी वापर करून उत्पादन वाढवावे, कार्यकारी संचालक, साखर सरव्यवस्थापक, उस विकास अधिकारी, आणि शेतकी विभागाशी निगडीत अधिकाऱ्यांनी या परिससंवादातुन आत्मसात केलेले ज्ञान थेट सभासद उस उत्पादक शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचवावे त्यातुन कारखान्याबरोबरच परिसराचा विकास साधावा असे आवाहन संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे यांनी केले.

इफको नवीदिल्ली व संजीवनी ग्रुपच्या सहकार्याने शुक्रवारी शिर्डी येथील मॅरीगोल्ड रिजेन्सी येथे उस पीक खत व्यवस्थापनात नॅनो खतांचा वापर, कृत्रिम बुध्दीमत्तेचा उस उत्पादन व साखर उताऱ्यात प्रभावी वापर या विषयावर एकदिवसीय राज्यस्तरीय परिसंवाद आयोजित करण्यांत आला होता त्याचे उदघाटन करतांना ते बोलत होते. राज्यभरातील विविध साखर कारखान्यांच्या २०० प्रतिनिधींनी यात सहभाग नोंदविला. प्रारंभी सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे साखर सरव्यवस्थापक शिवाजीराव दिवटे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

इफकोचे राज्य विपणन व्यवस्थापक श्री. यु. आर. तिजारे प्रास्तविक करतांना म्हणांले की, आंतरराष्ट्रीय सहकारीता वर्षात साईबाबांच्या नगरीत इफको व संचालक विवेक कोल्हे यांच्या सहकार्याने हा परिसंवाद आयोजित करता आला ही समाधानाची बाब असुन ३६ हजार सहकारी संस्थेच्या माध्यमांतुन हरितक्रांतीशी इफको आणि शेतकऱ्यांचे ५८ वर्षाचे नाते असुन यातुन संपुर्ण जगभर विविध खते व शेतीविषयक औषधे यावर संशोधन सुरू आहे. पाणी आणि खताच्या अधिक वापरामुळे जमिनीचा पोत दिवसेंदिवस कमी होत आहे म्हणून इफकोने नॅनो तंत्रज्ञानातुन ९४ पिकांवर २१ कृषी विद्यापीठात ३ लाख शेतकऱ्यांच्या शेतात प्रत्यक्ष चाचण्या घेवुन नॅनो युरिया व डीएपी खते, विविध किटकनाशके तयार केली ही अभिमानाची बाब आहे. नॅनो खत मात्रा प्रभावी वापरासाठी सध्या इफकोची शेतकऱ्यांमध्ये जनजागृती सुरू आहे. उस शेतीबरोबरच अन्य पीक उत्पादनांतुन शेतकरी उन्नती व्हावी हा मुख्य उददेश आहे असे ते म्हणाले.


बिपीनदादा कोल्हे पुढे म्हणाले की, औद्योगिक विकासाचा पाया अधिक मजबुत करण्यांसाठी साखर उद्योग हा मुख्य घटक आहे. मात्र अलिकडच्या काळात त्याकडे सर्वांचे दुर्लक्ष होतांना दिसत आहे. कापड उद्योगाप्रमाणेच साखर उद्योगाची अवस्था सुरु आहे. शेतकरी कामगार व त्यावर अवलंबुन असणार सर्वच घटक टिकले पाहिजे सहकार क्षेत्राने या राज्याबरोबरच देशाच्या प्रगतीत मोठे योगदान दिले आहे, मात्र त्याच्यासमोर आता खाजगीचे आव्हान उभे राहिले आहे. सहकार वाचला पाहिजे. एफआरपी देतांना साखर कारखान्यांना मोठा संघर्ष करावा लागत आहे, तेंव्हा साखरेसह इथेनॉल विक्रीचा दरही त्या प्रमाणांत वाढला पाहिजे, त्यासाठी केंद्र व राज्य शासनाने तातडीने पावले उचलावी, ज्यांच्याकडे उसाची प्रत्यक्ष उपलब्धता आहे त्यांनाच गाळप क्षमता वाढविण्यांची परवानगी द्यावी अन्यथा यातुन अनेक प्रश्न निर्माण होतील.

यावेळी इफको (पुणे) चे वरिष्ठ विपणन डॉ एम. एस. पोवार यांनी उस पीक खत व्यवस्थापनामध्ये इफको नॅनो खतांचा वापर या विषयावर, तर ऊस उत्पादन व साखर उताऱ्यात वाढ यासाठी एआय कृत्रिम बुध्दीमत्तेचा प्रभावी वापर याविषयी मृदाशास्त्र कृषी विज्ञान केंद्र बारामतीचे विशेषज्ञ डॉ विवेक भोईटे, वसंतदादा शुगर इन्स्टीटयूट (पुणे) चे पीक उत्पादन व संरक्षणातील प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. ए. डी. कडलग यांनी मार्गदर्शन केले. इफको एम. सी. (पुणे) चे विभागीय विपणन व्यवस्थापक श्री. दौलतराव बोरस्ते यांनी ऊस रोग व कीड व्यवस्थापन विषयावर मार्गदर्शन करून अधिकाऱ्यांच्या शंकांचे निरसन करून इफकोच्या विविध कीटकनाशक उत्पादनाविषयी माहिती दिली. इफको अहिल्यानगर व कोपरगावचे क्षेत्रीय अधिकारी वैभव ढेपे, तुषार गोरड यांनी सुत्रसंचलन करून आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी केन मॅनेजर जी. बी. शिंदे, ऊस विकास अधिकारी शिवाजीराव देवकर, सी. एन. वल्टे व त्यांच्या सर्व सहकारी बांधवांनी विशेष परिश्रम घेतले.




# SPOT NEWS

## संजीवनीच्या पाच अभियंत्यांना सॅप कोर्समुळे दोन बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये नोकरी



**कोपरगाव । वीरभूमी –** आपल्या विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे ज्ञान उपलब्ध करून देण्यासाठी संजीवनी अभियांत्रिकी महाविद्यालयाने परदेशी विद्यापीठे व नामांकित कंपन्यांबरोबर सामंजस्य करार केले आहेत. अशाच करारातुन सॅप (सिस्टिम्स, ॲप्लिकेशनस् अँड प्रॉडक्टस् ईन डेटा प्रोसेसिंग) या बहुराष्ट्रीय सॉफ्टवेअर कंपनीचे प्रशिक्षण आपल्या विद्यार्थ्यांना पदवी शिक्षण घेत असतानाच दिले. या प्रशिक्षणाच्या जोरावर ॲटलस कॉप्को या कंपनीने दोन व टेक महिंद्रा या कंपनीने तीन अभियंत्यांची नोकरीसाठी निवड करून चांगल्या पगाराही दिला, अशी माहिती महाविद्यालयाच्या अधिकृत सुत्रांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे. स्वीडनमध्ये मुख्यालय असलेल्या ॲटलस कॉप्को या कंपनीने मेकॅट्रॉनिक्स इंजिनिअरींगच्या अस्मिता अमोल आहेर व मेकॅनिकल इंजिनिअरींगच्या साक्षी अभिजीत भोंगळे यांची निवड केली. टेक महिंद्रा या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपनीने कॉम्प्युटर इंजिनिअरींगच्या दिप्ती शिवाजी खोंड व सायली अजय भिंगानिया आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर इंजिनिअरींगच्या आश्रय सुनिल दिवान यांची निवड केली. संजीवनीचे अध्यक्ष श्री नितिनदादा कोल्हे मॅनेजिंग ट्रस्टी श्री अमित कोल्हे यांनी सर्व निवड झालेले अभियंते व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले आहे.

> मी कोपरगांव तालुक्यातील मळेगांवथडी येथिल शेतकऱ्याची मुलगी. आमच्या परीवारातील इंजिनिअर होणारी मी पहिली मुलगी आणि नोकरीसाठी बाहेर पडणारीही पहिलीच. मी स्वावलंबी व्हावे ही माझ्या पालकांची इच्छा म्हणुन त्यांनी मला विश्वासाने संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजमध्ये शिक्षणासाठी दाखल केले. मीही जिध्दीने अभ्यास केला. शेवटच्या वर्षात असताना सॅपचा कोर्स केला. येथेच सॅप कोर्सची सोय असल्यामुळे मला इतर कोठे जाण्याची गरज पडली नाही. शेवटच्या सत्रात असताना आमच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाने टेक महिंद्रा कंपनीचे कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन केले. सॅपच्या कोर्समुळे कंपनीला अपेक्षित असणारे सॉफ्टवेअर्सचे ज्ञान मला होते. तसेच माझी मुलाखतीची भरपुर तयारी करून घेण्यात आली होती. कंपनीच्या प्रतिनिधिंनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची मी आत्मविश्वासाने उत्तरे दिली आणि माझी चांगल्या पगारावर नोरीसाठी निवड झाली. ज्या विश्वासाने मी प्रवेश घेतला होता, तो संजीवनीने सार्थ केला आणि माझ्या पालकांचे आणि माझे स्वप्न पुर्ण झाले.
>
> – **दिप्ती खोंड,** नवोदित अभियंता

## नगरच्या डॉ. सौरभ हराळ यांना आंतरराष्ट्रीय यंग रिसर्चर पुरस्कार

**नगर । वीरभूमी –** नगरचे नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. सौरभ हराळ यांना दिल्ली येथे झालेल्या आशिया-पॅसिफिक अकादमी ऑफ ऑप्थाल्मोलॉजी (एपीएओ) परिषदेत यंग रिसर्चर वॉर्डने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या डोळ्यांच्या लर्जीवरील (आय ॲलर्जी) नवीन उपचार पद्धतीच्या संशोधनासाठी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ. सौरभ हराळ यांनी इंटरफेरॉन अल्फा २ बी या नवीन औषधांवर संशोधन केले आहे.
















वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर-४१४६०१ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

युवा नेतृत्व

मा. आ. नरेंद्र पा. घुले | मा.आ. चंद्रशेखर घुले पा. | मा. तुकाराम पवार

दैनिक वीरभूमी वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...!

रविंद्र उर्फ भोरु म्हस्के

दैनिक वीरभूमी वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...!

मा. श्री. रमेश गोरे

माजी नगरसेवक, पाथर्डी नगरपालिका

शिवसेना

दैनिक वीरभूमी वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...!

सौ. मंजुषा (धस) चितळे
मा. सरपंच, चितळवाडी

मा.श्री. अंकुश चितळे
उपजिल्हा प्रमुख, शिवसेना, अहमदनगर दक्षिण

शिवसेना, युवासेना, महिला आघाडी नगर दक्षिण

पाथर्डी । शेवगाव । कर्जत । जामखेड । राहुरी

खा. सुजयदादा विखे पा. | आ. मोनिकाताई राजळे | मा. अभयकाका आव्हाड | मा. नंदकुमार शेळके

दैनिक वीरभूमी वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...!

मा. श्री. प्रशांत शेळके, पाथर्डी

पावन गणपती लॉजिंग

Ac - Non Ac रूम उपलब्ध ..

सुरक्षित व सर्व सुविधायुक्त राहण्याची पंचतारांकित सोय...
पत्ता : शेवगाव रोड, पाथर्डी, जि. अ.नगर

प्रोपा. : आजिनाथ डोमकावळे
संपर्क : ९९२१७२४२४७

दैनिक वीरभूमी वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...!

पावन गणपती मोबाईल

लोन सुविधा उपलब्ध

सर्व नामांकित कंपन्यांचे मोबाईल उपलब्ध
मोबाईल विक्री व दुरुस्ती सेवा
कोरडगाव चौक, पाथर्डी

पावन गणपती प्रतिष्ठान,
कसबा पेठ, पाथर्डी

श्री. आजिनाथ डोमकावळे । सामाजिक कार्यकर्ते

दैनिक वीरभूमी वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...!

इजाज भांडी भंडार
वीर सावरकर मैदान, पाथर्डी

इजाजभाई मित्र मंडळ
इंदिरानगर, पाथर्डी

मा. इजाजभाई शेख
सामाजिक कार्यकर्ते

युवा नेते इजाजभाई शेख मित्र मंडळ, पाथर्डी

दैनिक वीरभूमी वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...!

मा. अमोल गर्जे | मा. मुकुंद गर्जे
सामाजिक कार्यकर्ते

गर्जे सराफ
नवी पेठ, पाथर्डी

मा. अमोल गर्जे

। गोल्डन ग्रुप । श्रीराम युवक मंडळ

पाथर्डी, जि. अहिल्यानगर

दैनिक वीरभूमी वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...!

रामनाथ द्वारकादास बंग
माजी नगरसेवक, पाथर्डी नगरपरिषद

सौ. दिपाली रामनाथ बंग
माजी उपनगराध्यक्षा तथा विद्यमान नगरसेविका, पाथर्डी नगरपरिषद

रामनाथ बंग मित्र मंडळ, पाथर्डी

स्व. ना. ग. उर्फ बाबूजी आव्हाड
मा. आमदार, थोर स्वातंत्र सेनानी

लोकनेत्या
ना. पंकजाताई मुंडे

मा. खा.
डॉ. सुजयदादा विखे पा.

आ. मोनिकाताई राजळे

एकच ध्यास
सर्वसामान्यांचा
विकास

दैनिक वीरभूमी वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...!

मा. अभय आव्हाड
मा. नगराध्यक्ष न. पा. पाथर्डी
अध्यक्ष, पार्थ विद्या प्रसारक मंडळ, पाथर्डी
मा. अधिसभा सदस्य, पुणे विद्यापीठ, पुणे

पार्थ विद्या प्रसारक मंडळ
पाथर्डी, जि. अहमदनगर

पार्थ विद्या प्रसारक मंडळ संचलित

श्री विवेकानंद विद्यामंदिर पाथर्डी .
श्री विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर पाथर्डी.

हीरक महोत्सवी वर्ष ६०

शैक्षणिक क्षेत्रात उज्वल यशाची परंपरा कायम राखणारे विद्यालय

दैनिक वीरभूमी वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...!




* शुभेच्छुक *

मा. अभय आव्हाड
अध्यक्ष, पार्थ विद्या प्रसारक मंडळ, पाथर्डी

मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका, पर्यवेक्षक व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वृंद.


आत्मा मालिक मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल
कोकमठाण, शिर्डी-कोपरगाव रोड, समृद्धी महामार्ग सर्कल जवळ, कोपरगाव
* मोफत सुविधा *
* अँजिओग्राफी * अँजिओप्लास्टी
* बायपास सर्जरी
* सर्व प्रकारचे ओ.पी.डी. केसपेपर फ्री
सोनोग्राफी फक्त 400/- रुपयांत
एक्स-रे फक्त 100/- रुपयांत
लॅब तपासणी 50% पर्यंत सुट
औषधींवर 20% पर्यंत सुट
- अधिक माहितीसाठी संपर्क -
9090919196 / 7304755655


दैनिक वीरभूमी वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...!
उद्दिष्टपूर्ती तुमच्या विश्वासाची!
₹ १०००,००,००,०००
• एक हजार कोटी •
आपल्या उत्स्फुर्त प्रतिसादामुळे समताने दि. ३१ डिसेंबर २०२४ रोजी
एक हजार कोटी ठेवींचा टप्पा पूर्ण केला असुन,
समता पतसंस्था महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील नंबर १ ची पतसंस्था
होण्याचा मान तुमच्यामुळे समताला मिळाला,
त्याबद्दल आपले मनःपूर्वक आभार!
Since 1986
समता पतसंस्था
टेन्शन नाही, रिटर्न्स निवडा!
३८ वर्षे ग्राहकांच्या विश्वासाची!
मुख्य कार्यालय : सहकार मंदिर, समता मार्ग, कोपरगांव | www.samatapat.com | संपर्क : ७७२२ ०१० २२२


शिक्षणमहर्षी
मा.खा.कर्मवीर शंकरराव काळे साहेब
आशुतोष पर्व २
दैनिक वीरभूमी
वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...!
पश्चिमेचे समुद्राला वाहून जाणारे पाणी अतितुटीच्या गोदावरी खोऱ्यात वळवून सिंचनाच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील.
कोपरगाव मतदारसंघात असलेल्या के. टी. वेअरचे ब्रिज कम बॅरेजेस मध्ये रुपांतर करून दळणवळण सुकर करणार.
कोपरगाव मतदारसंघाजवळ असलेल्या शिर्डी देवस्थानाशी मतदारसंघातील तीर्थक्षेत्र जोडून 'तीर्थक्षेत्र कॉरीडोरची' निर्मिती करणार.
कोपरगाव मतदारसंघातून वाहणाऱ्या पवित्र गोदावरी नदीची स्वच्छता व सुशोभीकरण तसेच आवश्यक त्या ठिकाणी घाट निर्मिती करणार.
रा.मा. 65 हा एन.एच.ए.आय. कडे वर्ग करून या रस्त्याचे दर्जेदार व मजबूत काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरु.
कोपरगाव मतदारसंघातून प्रतिभासंपन्न खेळाडू निर्माण व्हावे यासाठी शहरालगत अद्ययावत सुविधासह क्रीडा संकुल उभारणार.
सावळीविहीर-कोपरगाव एमआयडीसी बरोबरच कोपरगाव शहरालगत नवीन एमआयडीसी उभारून रोजगार निर्मितीसाठी प्रयत्नशील.
कोपरगाव शहरातील इतर महापुरुषांच्या स्मारकाप्रमाणेच वीर महाराणा प्रताप व भगवान एकलव्य यांचे भव्य दिव्य स्मारक उभारणार.
विकास केलाय, करतच राहणार